MHYA150000322013

## <u>नियमित दिवाणी मुकदमा क्रं.०५/२०१३ मधील नि.क्र.५६ वरील आदेश</u>

१. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज हा त्यास पुर्नविलोकनाचा अर्ज दाखल करायला झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादीचे असे कथन आहे की, न्यायालयाने नि ५३ कडे दिनांक ०६/०२/२०२० रोजी आदेशपारीत करुन प्रतिवादीचा वादीचा साक्षीदार क्रमांक १ गोपाल राठोड याला पुन्हा साक्षीसाठी बोलविण्याचा अर्ज नामंजुर केला आहे. प्रतिवादीने सदर आदेशाच नक्कल दिनांक १२/०३/२०२० प्राप्त केली आहे. त्यानंतर कोरोना माहामारी सुरु झाली व परिस्थीती हाता बाहेर गेली तसेच प्रतिवादी हा वयोवृध्द असल्याने मुदतीमध्ये पुर्नविलोकनाचा अर्ज मुदतीत दाखल करु शकला नाही. सदरचा अर्ज दाखल करण्यास प्रतिवादीला ३३९ दिवसाचा विलंब हा वरील कारणावरुन झाला आहे. त्यामुळे सदरचा विलंब हा माफ करण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे. याउलट वादीने सदर अर्जावरती आपले म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या कथनाचा इन्कार केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादीचा पुर्नविलोकनाचा अर्ज हा कायदयानुसार चालण्यास पात्र नाही तसेच प्रतिवादीला सदर अर्ज दाखल करण्यास ३३९ दिवसाचा विलंब झाला आहे. तो दर दिवसाप्रमाणे प्रतिवादीने स्पष्ट केला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. प्रस्तुत प्रकरणात वादीने मुख्यता सदर अर्ज नामंजुर करण्यास दोन गोष्टीवर आक्षेप नोंदविला आहे. तो म्हणजे प्रतिवादीचा पुर्नविलोकनाचा अर्ज कायदयानुसार चालण्यास पात्र नाही व विलंबाचा प्रत्येक दिवस स्पष्ट केला नाही. परंतु प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज मंजुर केल्याशिवाय त्याला त्याचा पुर्नविलोकनाचा अर्ज चालण्यास पात्र आहे की नाही याबद्दल युक्तीवाद करता येणार नाही तसेच प्रतिवादीने त्यांच्या प्रस्तुत अर्जामध्ये कोरोना माहामारीमुळे व त्यांच्या वयोवृध्दपणामुळे वेळेत सदरचा अर्ज दाखल करु शकला नसल्याचे कथन केले आहे म्हणजेच प्रतिवादीने त्याला झालेला विलंब स्पष्ट केला आहे. तसेच न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा सौदेपत्रानुसार शेताची खरेदी करुन मिळण्यासाठी दाखल केला असल्याचे दिसून येते. प्रस्तुत दावा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे अर्जातील कारणे व दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर

प्रतिवादीला पुर्नविलोकनाचा अर्ज दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करणे योग्य व संयुक्तीक आहे. तसेच वादीला प्रतिवादीने सदरचा अर्ज वेळेत दाखल न केल्यामुळे झालेल्या त्रासाबद्दल प्रतिवादीस वादीला कॉस्ट देण्याच्या अटीवर सदर अर्ज मंजूर करणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

अर्ज मंजूर करण्यात येतो प्रतिवादीला पुर्नविलोकनाचा अर्ज दाखल करायला झालेला विलंब प्रतिवादीने वादीला रु. १०००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)

VIKAS SAVATA SHINDE
Digitally signed by VIKAS SAVATA SHINDE
Date: 2023.02.02 17:15:51 +0530

दि.०२/०२/२०२३

(वि.सा.शिंदे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नेर.